Io

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** खंडाळा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0171 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**23/10/2024 06:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 22/10/2024
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/10/2024
   **Time From (वेळेपासून):** 16:24 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 06:16 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/10/2024 **Time (वेळ):** 06:16 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 009

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/10/2024 06:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भूमी अभिलेख कार्यालय खंडाळा , खंडाळा ,खंडाळा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. अशोक चुनिलाल रावळ

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : चुनिलाल

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1959

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लोणंद,खंडाळा ,खंडाळा ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लोणंद,खंडाळा ,खंडाळा ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9975691885

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | उर्मिला अशोक गलांडे | | | 1. समर्थ प्लाझ, प्लट न14,बुधवार पेठ, दुसरा मजला,पुणे ,पुणे ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्वीटी उर्फ साक्षी शिवाजी उमाप | | पती का नाम : शिवाजी | 1. रा मु माळेवाडी,श्रीरामपुर , श्रीरामपुर ,श्रीरामपूर तालुका, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी श्री. अशोक चुनिलाल रावळ वय-65 वर्षे, शिक्षण- 12 वी, व्यवसाय- हॉटेल व लॉजिंग रा. लोणंद ता. खंडाळा, जि. सातारा मो.नं. 9975691885

मी दिनांक 22/10/2024 रोजी ए.सी.बी, सातारा येथील डीवायएसपी श्री राजेश वाघमारे साहेब यांना फोनकरून माझ्याकडे करण्यात येणाऱ्या लाचेच्या मागणी बाबत थोडक्यात तक्रार सांगितली. परंतू मला ए. सी. बी. सातारा कार्यालयात येण्यास जमणार नाही. तरी तुम्हीच संभाजी चौक खंडाळा जि. सातारा येथे येवून तक्रारी नुसार कारवाई करावी ही विनंती मी डीवायएसपी वाघमारे साहेब यांना केली. त्यावर डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला कारवाईचे पुढील नियोजन थोडक्यात सांगितले.

त्या नियोजनानुसार दिनांक 22/10/2024 रोजी सकाळी 12.25 वाचे सुमारास डीवायएसपी, श्री राजेश वसंत वाघमारे एसीबी, सातारा यांचे सुचनेनुसार मी माझी मारुती अल्टो कार क्रमांक एम एच 42 ए एक्स 2867 या मधून माझे खाजगी चालकासह खंडाळा येथील संभाजी चौक ते हरळी रोडवरील दुकान गाळ्या जवळ आलो. त्या ठिकाणी डीवायएसपी, श्री राजेश वसंत वाघमारे हे त्यांचे सहकाऱ्यांसह शासकीय वाहनामध्ये हजर होते. तेव्हा डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला त्यांचे शासकीय वाहनात बसवून माझी ओळख करून घेवून त्यांचे सह असणाऱ्या दोन पंचांची व इतर सहकाऱ्यांची आम्हाला एकमेकांना ओळख करून दिली. डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला माझे तक्रारीबाबत विचारणा केली असता मी त्यांना माझा हॉटेल व्यवसाय असून माझे नावे लोणंद ता. खंडाळा येथे असलेली सिटी सर्व्हे नंबर 177/428 या क्षेत्रफळ 181.04 चौ.मी. या मिळकतीवर चुकून लागलेला सत्ता प्रकार ब कमी करून मिळणेबाबत मी उपविभागीय अधिकारी वाई यांना लेखी अर्ज सादर केला होता. त्यानंतर तो पुढील कार्यवाहीसाठी तहसिलदार ऑफिस, खंडाळा येथे पाठविला. तहसिल कार्यालयाने चौकशी करून चुकून लागलेला सत्ता प्रकार ब कमी करून मिळणेकरिता भुमी अभिलेख कार्यालय, खंडाळा येथे पाठविला आहे.

त्यानंतर मी माझ्या अर्जावर पुढील काय कार्यवाही केली की नाही? याबाबत उपअधीक्षक श्रीमती गलांडे मॅडम यांचेकडे गेले एक वर्षांपासून हेलपाटे मारत आहे. तरी देखील माझे काम झाले नव्हते म्हणून मी सुमारे एक महिन्यापुर्वी दिनांक 10/09/2024 रोजी गलांडे मॅडम यांना भेटून माझ्या कामाबद्दल विचारले असता गलांडे मॅडम यांनी मला मौजे लोणंद येथील सिटी सर्व्हे नंबर 177/428 क्षेत्रफळ 181.04 चौ.मी. या मिळकतीवर चुकून लागलेल्या सत्ता प्रकार ब कमी करून सत्ता प्रकार अ करणेकरिता चौकशी अहवाल देणेकामी 1,50,000/- रु लाचेची मागणी करत असलेबाबतची तक्रार पंचासमक्ष डीवायएसपी वाघमारे साहेब यांना सांगितली व माझी हाताने लिहिलेली तक्रार डीवायएसपी वाघमारे साहेब यांना दिली असता डीवायएसपी वाघमारे साहेब व पंचांनी ती वाचुन बघितली व त्यावर सह्या केल्या.

त्यानंतर डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला पंचासमक्ष पडताळणी कारवाईची माहिती दिली. व प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानुसार डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी पंचासमक्ष मला पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व माझ्या शर्टचे आत मध्ये असलेल्या बनीयनला पीनच्या सहाय्याने व्हाईस रेकॉर्डर सुरु करून लावून दिले व तेथुन 13.20 वाचे सुमारास मी व पंच नंबर 1 शितल भगवान नांगरे असे आम्ही दोघे मी आणलेल्या अल्टो चारचाकी गाडी एमएच 42 ए एक्स 2867 मधून माझे गाडीचा खाजगी चालक यांचे सोबत भूमी अभिलेख खंडाळा कार्यालयातील लोकसेविका श्रीमती गलांडे मॅडम यांची भेट घेणे कामी रवाना झालो. त्यावेळी डीवायएसपी वाघमारे साहेब व त्यांचे सहकारी त्यांचे वाहनात तिथेच थांबून राहिले.

मी व पंच नंबर 1 शितल नांगरे असे भूमी अभिलेख खंडाळा कार्यालय येथे पोहाचलो. त्यावेळी उर्मिला गलांडे

उपअधीक्षक, या त्यांचे केबीनमध्ये होत्या. मी माझे कामासंदर्भाने चर्चा केली या चर्चे दरम्यान, मी त्यांना "किती दयायचेत काय सांगा की, मला म्हणजे ते पसे, अं, आणतो, म्हणजे त्या पद्धतीने देवून टाकू, एकदा विषय मिटून जाईल, मला हेलपाटे घालायला आता वेळ नाय, मॅडम आता मग काय, सारखं " असे म्हणाले त्यावर लोकसेविका गलांडे या, झालच की आपलं बोलण असे म्हणाल्या, त्यावर मी नाय तेच की, आता कंफ्युझन आहे ना ते, असे म्हणालो त्यावर लोकसेविका गलांडे बघा, तुमच्या ह्यान काय करायचं ते असे म्हणाल्या, तेव्हा मी गलांडे मॅडमला म्हणालो की, तस नाय तुम्ही सांगा, मॅडम मी कसं सांगणार, आता तुम्ही तुम्हाला मी काय तर दयायचो, तुम्ही म्हणायचा काय तर, असलं नको, ते आपला पंन्नासचा विषय होता नां, म त्यो एजंट आल्यावर दीड चा विषय झाला, त्याच्यामुळं ते कंफ्युझ झालो. बाकी काय नाय, त्यावर लोकसेविका गलांडे हळू आवाजात उजव्या हाताचे तर्जनीचे बोट दाखवून 1 लाख म्हणाल्या. त्यावर मी म्हणालो की, अं, एक लाख यात कमी करा साहेब मॅडम काय, त्यावर लोकसेविका गलांडे मॅडम म्हणाल्या की, बर काय तुमच्या ह्यांन त्यावर मी एक लाख रुपये जास्त होतायत असे म्हणालो, त्यानंतर लोकसेविका गलांडे मॅडम या तुमच्या ह्यानी करा कस करायचं ते असे म्हणाल्या, त्यावर मी पन्नास देता, मॅडम तुम्ही बोला तो आकडा, पन्नास मध्ये करून टाका, मॅडम त्यांच त्यांच मी भागवितो काय असेल ते, असे म्हणाल्यावरून लोकसेविका गलांडे मॅडम, तुम्हीच काय असल ते, अं, येथील ते तीन वाजता अशा म्हणाल्या त्यावर मी म्हणालो की, हं, मला पैसे आणायला म्हणजे, किती मागवू सांगा की, त्या पद्धतीने मुलाला फोन करतो. त्यावर लोकसेविका गलांडे मॅडम या सेव्हंटी फाइ८० थावुजंड आणा असे म्हणून माझ्याकडे पंच्याहत्तर हजार रुपयेची लाचेची मागणी केली, त्यावर मी पंच्याहत्तर, पंच्याहत्तर तुम्हाला दयायचे, पंच्याहत्तर हजार ठिक आहे. मी मागवून घेतो. अं. येवू का मॅडम असे म्हणालो. त्यानंतर मी व पंच नं.1 नांगरे असे माझे मारूती अल्टो चारचाकी वाहन क्र. एम.एच.42 ए एक्स 2867 मधून चालकासह पथक थांबले वाहनाजवळ परत 13.36 वाचे सुमारास आलो. माझेकडील व्हाईस रेकॉर्डर डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी बंद केल्यानंतर त्यांना घडलेली हकीकत सांगितली व डीवायएसपी वाघमारे साहेब व पंचानी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून खात्री करुन घेतली की, भूमी अभिलेख खंडाळा कार्यालयातील उपअधीक्षक श्रीमती गलांडे मॅडम माझे कडे 75,000/- रूपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम दुपारी 03.00 वा चे नंतर आणून देण्यास सांगितले आहे. तेव्हा डीवायएसपी वाघमारे साहेब व पंचाची खात्री झाल्याने पुढील सापळा कारवाई करण्याचा निर्णय डीवायएसपी वाघमारे साहेब व पंचानी घेतला.

त्यानुसार लागलीच डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला व पंचाना सापळा पुर्व व सापळा कारवाईची माहिती थोडक्यात समजावून सांगितली व वेळेच्या अभावी पडताळणी पंचनामा तसेच संभाषण स्क्रिप्ट नंतर टाईप करण्यात येईल असे सांगितले, त्यानंतर मी डीवायएसपी वाघमारे साहेब यांचे सांगणेवरुन माझ्याकडे असलेली 75,000/- हजार रुपये लाचेची रक्कम म्हणुन पंचासमक्ष हजर केली. त्यानुसार डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी दिले सुचनेवरुन सहकाऱ्यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहून घेतले. डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावून सांगून सापळापुर्व व सापळा कारवाईची माहिती सांगितली. त्यानुसार डीवायएसपी वाघमारे साहेब व त्यांच्या सहकाऱ्यांनी पंचासमक्ष सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली त्यामध्ये लाचेच्या रक्कमेस व कापडी पिशवीस अँथ्रासिन पावडर लावली व सदरची अँथ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम ही अँथ्रासिन पावडर लावलेल्या कापडी पिशवीत ठेवून दिली. व लोकसेविका श्रीमती गलांडे मॅडम यांना लाचेची रक्कम दिल्या नंतर डाव्या हाताने डोक्यावरून दोनदा हात फिरवून इशारा करण्याच्या सुचना डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला दिल्या.

त्यानंतर डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी पंचासमक्ष मला सापळा कावाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व माझ्या शर्टचे आत मध्ये असलेल्या बनीयनला पीनच्या सहाय्याने व्हाईस रेकॉर्डर सुरु करून लावून दिले. व तेथून 16.10 वाचे सुमारास मी व पंच नंबर 1 शितल भगवान नागरे असे आम्ही दोघे मी आणलेल्या अल्टो चारचाकी गाडी एमएच 42 ए एक्स 2867 मधून माझे गाडीचा खाजगी चालक यांचे सोबत भूमी अभिलेख खंडाळा कार्यालयातील उपअधीक्षक श्रीमती गलांडे मॅडम यांची भेट घेणे कामी रवाना झालो. आमचे पाठोपाठ डीवायएसपी वाघमारे साहेब व सापळा पथक हे त्यांचे शासकीय वाहनातून आले. भूमी अभिलेख खंडाळा चे पाठीमागील मोकळ्या मैदानात वाहन उभेकरुन मी व पंच नं.1 नांगरे या कार्यालयात गेलो. त्यावेळी सापळा पथक खंडाळा प्रशासकीय इमारतीमध्ये कोणास संशय येणार नाही अश्या रितीने सापळा लावून थांबून राहिलो. मी व पंच नं.1 नांगरे यांचे समवेत लोकसेविका श्रीमती गलांडे मॅडम यांचे केबीन मध्ये जावून भेट घेतली. व माझे कामाबाबत चर्चा केली तेव्हा मी त्यांना आता मला उशीर होईल मंग जायला परत, मंग येताना तुम्ही आणल्यात मी पंच्चाहत्तर हजार रुपये आणल्यात, पंच्चाहत्तर हजार रुपय तुम्ही घ्या त्यांच काय असल ते बघतो मी, त्यांना आता फक्त तेवढं मी सत्ता प्रकार आपल सत्ता प्रकार ब आहे ती अ करा अ च होईल ना त्याज. त्यावर लोकसेवीका गलांडे मॅडम यांनी हो

म्हणून तिकडे पाठवायला लागला आपल्याला असे म्हणाल्यावर मी त्यांना ही घ्या असे म्हणून पैसे देत असताना लोकसेवीका गलांडे यांनी बेल वाजवून दुसऱ्या इसमाला बोलावून, साक्षीला बोलवा ओ जरा बोलवते. थांबा जरा असे म्हणून त्यांचे फोनवरून फोन करून कुठे आहेस तु? हा इकडे ये असे बोलल्यानंतर एक महिला केबीनमध्ये आली तिच्याकडे बघून लोकसेविका गलांडे यांनी हिच्याकडं च दया बाहरे नेवून दया, इथं नको सीसीटीव्ही आहेत इथं असे म्हणाल्यानंतर मी म्हणालो बॅगेत आहेत कायच अडचण नाही. तेव्हा लोकसेविका गलांडे या नाही तो नाही प्रश्न तिज्याकडं बाहेर नेवून दया, असे म्हणाल्या. त्यानंतर तिथे असलेल्या महिला साक्षी उमाप यांनी मला तिकडे जावू आपल्या रेकॉर्ड रूमच्या तिथं असे म्हणाल्यावरून मी व पंच नं.1 नांगरे असे महिला लोकसेविका उमाप यांचे बरोबर कार्यालयाचे बाहेर गेलो. त्यानंतर मी माझे कडील पॅन्टचे पुढील उजवे खिशातील लाच रक्कमेची पिवळी पिशवी साक्षी यांचेकडे देवून अं, अं घ्या मोजून घ्या, पंच्याहत्तर आहेत. असे म्हणाले तेव्हा लोकसेविका उमाप यांनी ते मॅडम बघतील असे म्हणुन ती लाच रक्कमेची पिशवी उजव्या हाताने स्विकारून कार्यालयात जाऊन त्यांचेकडील सॅक मध्ये ठेवली त्यावेळी मी पाठीमागून जाता जाता सापळा पथकास दिसेल अशा पध्दतीने पुर्व नियोजीत डाव्या हाताने दोन वेळा डोक्यावर हात फिरवनू इशारा केला असता डीवायएसपी वाघमारे साहेब यांचे सहकाऱ्यांनी येऊन लोकसेवक साक्षी उर्फ स्वीटी उमाप यांना लाचेच्या रक्कमेसह 16.24 वा चे सुमारास ताब्यात घेतले. तेव्हा डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी लोकसेविका साक्षी उमाप यांना लाच रक्कमेबाबत अधीक विचारणा केली असता त्यांनी लोकसेविका उपअधीक्षक श्रीमती गलांडे मॅडम यांचे सांगणे वरून लाच रक्कम स्विकारली असल्याचे सांगितले. त्यावरून डीवायएसपी वाघमारे साहेब व सापळा पथकातील सहकाऱ्यांनी लोकसेविका श्रीमती गलांडे मॅडम यांना त्यांचे केबीन मध्ये जावून ताब्यात घेतले ती वेळ 16.40 वा ची होती.
त्यानंतर डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यांचे ताब्यात घेतला. त्यानंतर डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी पंचासमक्ष सापळा कारवाई दरम्यान रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकूण सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई शासकीय विश्रामगृह, खंडाळा येथे करण्याचे निश्चित केले.
अशारितीने दिनांक 22/10/2024 रोजी 1) लोकसेवक उर्मिला अशोक गलांडे, वय-47 वर्षे, पद- उपअधीक्षक, भुमी अभिलेख, खंडाळा रा. समर्थ प्लाझ, प्लॅट नं.14, बुधवार पेठ, दुसरा मजला, पुणे वर्ग -2, यांनी माझे मौजे लोणंद येथील सिटी सर्व्हे नंबर 177/428 क्षेत्रफळ 181.04 चौ.मी. या मिळकतीवर चुकून लागलेल्या सत्ता प्रकार ब कमी करून सत्ता प्रकार अ करणेकरिता चौकशी अहवाल देतो म्हणू

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sunil sitaram shelke(I (Inspector)) / pi **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Rummh c

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):
दि 23/10/2024
11:00 वा

1690

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): sunil sitaram shelke
**Rank**(पद): पोलीस (Inspector)
**No.**(सं.): pi

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**